# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४

क्रमांक: शुनिप्रा/सूचना/१४०७ /२०२५

दिनांक : २७/१०/२०२५

## अंतीम सूचना

**वाचा :** १) प्राधिकरण कार्यालयाची दि. १३/०८/२०२५ रोजीची सूचना
२) प्राधिकरण कार्यालयाची दि. ०९/०९/२०२५ रोजीची सूचना
३) प्राधिकरण कार्यालयाची दि. १९/०९/२०२५ रोजीची सूचना
४) प्राधिकरण कार्यालयाची दि. ०८/१०/२०२५ रोजीची सूचना

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४(१) (क) नुसार तसेच प्राधिकरणाच्या दि. १८/०९/२०२५ च्या बैठकीतील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे शुल्क निर्धारणाचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याकरिता दि. १९/०९/२०२५ ते ३१/१०/२०२५ पर्यंत लिंक सुरु ठेवण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ प्राधिकरणाकडून वेळोवेळी सूचना देवूनही बऱ्याच संस्थांनी ऑनलाईन प्रस्ताव सादर केले नसल्याचे निदर्शनास येत आहे.

त्या अनुषंगाने संबंधीत संस्थांना पुनश्चः सूचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चे प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३१/१०/२०२५ असल्याने तसेच प्राधिकरणाकडून मुदतवाढ देण्यात येणार नसल्याने संस्थांनी दिलेल्या मुदतीत प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे.

Fees Regulating Authority ★ Maharashtra State ★

२७/१०/२५

**डॉ. अर्जुन चिखले भा.प्र.से.**
**सदस्य सचिव**
**शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई**